(45)

वनपरीक्षेत्र अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक पश्चिम मुंबई, यांचे कार्यालय,
स. न. १४७ पंचम सोसायटी जवळ, गोखले महाविद्यालय मार्ग,गोराई, बोरीवली (प.) ४०० ०९१
Email:- rfomangrovewm@gmail.com

सहाय्यक वनसंरक्षक
कांदळवन संरक्षण, मुंबई
यांचे कार्यालय
आवक क्रमांक :- 1081
दिनांक :- 15/1/2021
वन कर्मचारी सहाय्यक वनसंरक्षक

विषय:- Request mandated action against all concerned regarding large scale rabid dumping right next to wall boundary being constructed by mangroves cell to fence nitified mangroves forest areas in the periphery of charkop village in the Backyard of charkop po...

जा.क्र. प.मुंबई /बोरीवली तक्रा./634/२०२०-२१
बोरीवली दि : 22/12/2020

विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक, मुंबई
यांचे कार्यालय
आवक क्रमांक:- 2095
दिनांक 04/02/2021

प्रति,
मा.विभागीय वनअधिकारी
मुं.का.सं.घ. कुर्ला पूर्व
मार्फत : मा. सहा. वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई

संदर्भ : १) तहसीलदार बोरीवली यांचेकडील पत्र क्र. तह/बोरी/टे-३/कांदळवन/कावि-[illegible]/२०२०, दि.२७/१०/२०२०
२) चारकोप पोलिस ठाणे यांचेकडील पत्र जा.क्र. ७६१४ दि.०२.१०.२०२०.
३) वनपाल बोरीवली यांचेकडील पत्र जा.क्र.१२३ दि.०२.११.२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय क्र.१ व २ अन्वये या कार्यालयास तक्रार प्राप्त झाली. सदर अर्जात नमुद जागेवर तक्रारदार यांचेसह पहाणी व चौकशी करुन वनपाल बोरीवली यांचा अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार खालीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहे.

1. **मुळ तक्रारदार** – श्री. रेजी अब्राहम

2. **स्थळाचे वर्णन** – मौजे चारकोप ता. बोरीवली येथील सर्व्हे क्र. २२ पै न.भु.क्र. १४२

3. **अर्जाचा तपशील** – सदर तक्रारीत मौजे चारकोप येथे डेब्रिज टाकलेबाबत तक्रार दाखल केली आहे.

4. **स्थळाचे जी.पी.एस रिडिंग** – **१) N-१९ १२ ४१.७६ E- ७२ ४९ ०२.०३**

5. **Geo Tag Photo** – –

6. **स्थळ पंचनामा** – सदर तक्रारीची दि.२९.१०.२०२० रोजी मंडळ अधिकारी बोरीवली, तलाठी सजा. कांदीवली, वनपाल, वनरक्षक बोरीवली, परि. भु. न. भु. अधिकारी बोरीवली, पोलिस उप निरिक्षक चारकोप पोलिस ठाणे, अभियंता महानगर पालिका, तसेच तक्रारदार श्री. रेजी अब्राहम यांच्या वतीने श्री.विशाल कामोठे यांच्या समवेत वनरक्षक बोरीवली यांनी संयुक्त स्थळ पहाणी केली असता. सदर मौजे चारकोप ता. बोरीवली येथील सर्व्हे क्र. २२ पै न.भु.क्र. १४२ या जागेवर रॅबीटची ढीग असलेली जागा न.भु.क्र. १४२ मधील व सर्वे क्र.२७ पै मौजे चारकोप येथील खाजगी मिळकतीपैकी असल्याचे न.भु.क्र. कार्यालयातील कर्मचारी यांनी सांगितले. असे पंचनाम्यात नमुद आहे.

7. क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र आहे का ? –

८. सरकारी क्षेत्र आहे का? – नाही

९. **खाजगी कांदळवन क्षेत्र आहे का** ? – सदरचे क्षेत्र हे खाजगी मिळकतीपैकी असल्याचे नगर भुमापन अधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांनी सांगितले.

10. **सी.आर.झेड क्षेत्राचा उल्लेख एम.आर.सॅक. नुसार काय आहे** ? -

11. **अधिसुचना क्रमांक व क्षेत्र** – -

12. **31 डिसेंबर 2005 रोजी MRSAC MAP नुसार तक्रारीतील नमुद जागेवर कांदळवन होते का** ? – - नाही

13. **सद्यस्थितीत नमुद जागेवर कांदळवन आहे किंवा कसे याबाबत सुष्टष्ट अभिप्राय.**- - कांदळवन नाही.

14. **निष्कर्ष** : **(कोणी कार्यवाही करणे आवश्यक आहे.)** –

15. **खाजगी क्षेत्र असल्यास कोणी कारवाई करावी** ? **याबाबत त्यांचे पत्र दिले आहे का** ? – - महसुल विभागाने कारवाई करणे संयुक्तीक ठरेल.


16. **वनक्षेत्रपाल यांचा चौकशीचे अभिप्राय – सदरची तक्रार निकाली काढावी किंवा कसे** ? **याबाबत अभिप्राय.** गुगल अर्थ नकाशावर MRSAC नकाशाच्या सहाय्याने सुपरइंम्पोज करुन पाहिले असता २००५ साली सदर जागेवर कांदळवन अस्तित्वात नव्हते. सदरचे क्षेत्र हे अधिसुचित राखिव कांदळवन क्षेत्राचा भाग नाही. सदरचे क्षेत्र हे अधिसुचित कांदळवनापासून ५० मी. आत असल्याचे दिसून येत आहे. सदरचे क्षेत्र हे वनविभागाच्या ताब्यातील क्षेत्रापैकी नाही. मा. उच्च **न्यायालयाचे आदेशानुसार** PIL NO ३२४६/२००५ **अन्वये कांदळवनापासून ५० मीटर अंतरापर्यंत कोणतेही वनेत्तर काम करण्यास प्रतिबंध आहे**. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.जमीन-०७/२०१३/प्र.क्र.३७४/ज-१/ दि.१०.१०.२०१३ अन्वये सदर क्षेत्र ज्या विभागाच्या ताब्यात असेल त्या विभागाची जबाबदारी आहे.

माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.

(एस.एम.देशपांडे)
वनपरीक्षेत्र अधिकारी,
मु.का.सं.घ., पश्चि मुंबई

सोबत : १) गुगल अर्थ नकाशा २) पंचनामा

प्रत : तहसिलदार बोरीवली यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.
प्रत : सहाय्यक पोलिस निरिक्षक, चारकोप पोलिस ठाणे यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.


Charkop year 2005
reji abrahim
Legend
19 12 41.76 72 49 02.03
Google Earth
80 m


Charkop year 2020
reji abrahim
Legend
19 12 41.76 72 49 02.03
Google Earth
80 m

# पंचनामा

दि. २९/१०/२०२०

आम्ही पंचलोक खाली सह्या करणार आज रोजी समक्ष हजर राहून विचारलेवरून, वस्तुस्थिती पाहून पंचनामा लिहून देतो की, मौजे चारकोप, ता. बोरिवली येथे वनविभागाने बांधकाम केलेल्या सुरक्षा भिंती लगत डेब्रिजची/रॅबिटची भरणी झाल्याबाबत श्री. रजी मुखर्जी यांची तक्रार व त्यानुसार मा. तहसीलदार सो. बोरिवली यांचेकडील दि. २७/१०/२०२० रोजीच्या पत्रानुसार आज दि. २९/१०/२०२० वार गुरुवार, वेळ 1:00 pm वाजता नमूद तक्रारीच्या ठिकाणी मंडळ अधिकारी बोरिवली, त. सा. डिवली श्री. नाना वानखेडे, पीएसआय, चारकोप पो. ठाणे श्रीम. संगीता शेळके, परि. भू. न. भू. अधिकारी बोरिवली, वैशाली गवळी, वनरक्षक, बोरिवली श्री. पटले, अभियंता मं.न.पा. व तक्रारदार यांचे वतीने श्री. विशाल कामोठे हे सर्व नमूद ठिकाणी उपस्थित आहेत. तक्रारदार यांनी तक्रारीच्या अनुषंगाने जागा दाखविली असता, मौजे चारकोप ता-बोरिवली येथील एंटरप्राइज मार्केट पासून ते डिंगेश्वर मंदिरापर्यंत पश्चिमेकडील सर्वे क्र. ३१ लगत, वनविभागाने बांधलेल्या संरक्षित भिंती लगत रॅबिट्स टाकलेले आहे. सदर रॅबिटची भरणी असलेली जागा न.भू.क्र. 142 महसूल व सर्वे क्र. ४२ पै, मौजे चारकोप येथील खाजगी मिळकतीपैकी असल्याचे न.भू. कार्यालयाकडील अभिलेखावरून सांगितले. सदर रॅबिटची लांबी अंदाजे कांदळवनापासून 50 मीटरच्या आतील आहे. सदर भरणी कोणी केली याबाबत आम्हांस माहिती नाही. सदरचे रॅबिट हे मागील महिन्यानंतर टाकल्याचे समजते. तरी सदरचा पंचनामा लिहून दिला, तो वाचून दाखवला तो बरोबर आहे. म्हणून त्याखाली सह्या केल्या असे.

समक्ष

मंडळ अधिकारी बोरिवली

तलाठी डिवली

29/10/2020

पंच

(1) ... 9742492824
श्री. किशोर ...
वय 51 वर्षे
रा. ...नगर, बोरिवली (प.)

(2) Mithun S. Zore
Age- 38, Mob.- 9594618500

भारत सरकार

महाराष्ट्र शासन

# तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी बोरीवली यांचे कार्यालय

डॉ. न. रा. करोडे मार्ग, नाटकवाला लेन, एस. व्ही. रोड, बोरीवली (प.), मुंबई-४०००९२.
दुरध्वनी क्र. २८०७५०३४ ई-मेल :-tahsildarborivli11@gmail.com

कांदळवन

क्रमांक :-तह/बोरी/टे-३/कांदळवन/कावि-१२३५/२०२०
दिनांक :-२७/१०/२०२०.

प्रति,

१) सहा. आयुक्त, आर/दक्षिण विभाग
बृहन्मुंबई महानगरपालिका.

२) नगर भुमापन अधिकारी बोरीवली

३) वनपरिक्षेत्र अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई,
स.नं. १४७, पंचम सोसायटी जवळ,
गोखले महाविद्यालय मार्ग, गोराई, बोरीवली (प), मुंबई-४०० ०९१.

४) वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
चारकोप पोलीस ठाणे

५) मंडळ अधिकारी बोरीवली

६) तलाठी साझा कांदिवली

विषय :- Request mandated action against all concerned regarding large scale rabid dumping right next to wall boundary being constructed by mangroves cell to fence notified mangroves forest areas in the periphery of charkop village in the backyard of charkop po.....

संदर्भ :- मा.जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून ई-मेलद्वारे श्री. रेजी अब्राहम यांची प्राप्त झालेली तक्रार

उपरोक्त विषयाकींत प्रकरणी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून ई-मेलद्वारे श्री. रेजी अब्राहम यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झालेली आहे सदर तक्रारीत मौजे-चारकोप ता. बोरीवली येथे डेब्रिज टाकलेबाबत तक्रार दाखल केलेली आहे.

मा. उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.३२४६/२००४ रूपांतरीत जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दि. ६/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून कांदळवनचा -हास करण्या-या व्यक्तीविरूध्द वा संस्थेविरूध्द कार्यवाही करणे आवश्यक असलेने उपरोक्त जागेची सयुंक्त स्थळपहाणी दि. २९/१०/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता ठेवण्यात आली आहे. तरी आपण सदर वेळी तलाठी सजा कांदिवली यांचे कार्यालय, पत्ता- गोशाला,आकुर्ली रोड,कांदिवली (प), मुंबई-४०० थे उपस्थित रहावे. प्रकरणी संयुक्त स्थळपहाणी व सखोल चौकशी करून वस्तुस्थिती तपासावी. पहाणी अंती कारवाई करणेस आवश्यक असल्यास पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अन्वये संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्याची नियमानुसार कार्यवाही करून, जी.पी.एस. रिडींगसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(विनोद धोत्रे)
तहसीलदार बोरीवली

**प्रत** :- श्री. रेजी अब्राहम, प्लॉट नं. २४, जीवन संग्राम सोसायटी, ५ वा मगला, फ्लॅट नं. १०, सेक्टर-२, चारकोप, कांदिवली (प), मुंबई-६७.

२/- उपरोक्त विषयांबाबत आपला तक्रार अर्ज चौकशी करणेकामी या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर प्रकरणी आपण केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने संबंधित कागदपत्रांसह नमूद जागेवर नमूद दिवशी व वेळी हजर राहून तक्रारीतील नमूद ठिकाणी दाखवावे. प्रकरणी आपण सदर दिवशी हजर राहिले नसल्यास आपल्या गैरहजेरीत स्थळपहाणी करण्यात येईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकले जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

28/10/2020

D:\Kandalvan\2020\large scale rabid dumping charkop तक्रारदार श्री. रेजी अब्राहम -कावि-1233-20P.docx